या वर्षी खातेदारांनी आपल्या खात्यामध्ये उलाढाल चांगल्या प्रकारे केल्यामुळे आपल्या बँकेचे एन. पी. ए.प्रमाण कमी राखण्यामधे मदत झालेली आहे. तरी बाकी सर्व खातेदारांनी आपले खाते नियमित करावे व बँकेच्या प्रगतीला हातभार लावावा. बँकेच्या कर्जदार सभासदांनी आपले कर्ज खाते नियमित ठेवावे अशी बँकेची अपेक्षा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या आदेशानूसार उत्पन्न क्षमता नसलेल्या खात्यावरील व्याजाची १००% व मुद्दलाची नियमानूसार तसेच उत्तम जिंदगीसाठी नियमाप्रमाणे तरतूद आणि सहकारी कायद्यातील व बँकेचे पोटनियमातील तरतूदी केल्यानंतर दि. ३१-०३-२०१८ अखेर बँकेस ढोबळ नफा (आयकर आकारणीपूर्वीचा) रूपये ११,७४,२८,१२८.३६ झाला आहे. यावर आयकर रू. ५,६७,०६,२०८,.०० चा भरणा केल्यानंतर चा नक्त नफा रू. ६,०७,२१,९२०.३६ इतका झाला आहे.

सहकारी कायदा व पोटनियमातील तरतूदी लक्षात घेवून संचालक मंडळाने खालीलप्रमाणे नफ्याचे विनियोजन करणेबाबत आमसभेस शिफारस केली आहे. यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

## -: नफ्याचे विनियोजन :-

| | | |
|---|---|---|
| ०१. वैधानिक राखीव निधीस जमा | रू. | १,५२,००,०००.०० |
| ०२. शेअर्सवर सभासदांना ९ टक्के लाभांश – | रू. | २,६५,०२,३६८.०० |
| ०३. गुंतवणुक चढउतार निधी | रू. | ५०,००,०००.०० |
| ०४. इमारत निधी | रू. | १,२३,१९,५५२.३६ |
| ०५.अमृत महोत्सव निधी | रू. | ५,००,०००.०० |
| ०६.हिरक महोत्सव निधी | रू. | १०,००,०००.०० |
| ०७.शिक्षण निधी | रू. | २,००,०००.०० |
| एकुण | रू. | ६,०७,२१,९२०.३६ |

आपला

**स.भ.गुप्त**

अध्यक्ष